# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२७४ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.५ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## राम मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ गज, सिंह, हनुमान आणि गरुडाच्या मुर्तीची स्थापना; मंदिर ट्रस्टनी शेअर केले फोटो

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोद्धेत २२ जानेवारी रोजी राम मंदिराचे उद्घाटन होणार आहे. त्यामुळे राम मंदिरामध्ये जय्यत तयारी सुरू आहे. १०० हून अधिक वर्षे ज्या राम मंदिरासाठी वाद सुरू होता, तो आता संपुष्टात आला असून राम मंदिराच्या उद्घाटनाने एक नवी सुरुवात होत आहे. राम मंदिराच्या उद्घाटनासाठी अनेक राम भक्त उत्सूक आहेत.अनेक लोकांना हे भव्य राम मंदिर कसे असेल आणि मंदिराची रचना कशी असेल, याबाबत कायम उत्सूकता होती पण आता सोशल मीडियावर राम मंदिराचे अनेक फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत आहे.



राम मंदिराच्या बांधकामाविषयी नवनवीन माहिती समोर येत आहे. अशातच राम मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ गज, सिंह, हनुमान आणि गरुडाच्या मुर्तींची स्थापना करण्यात आली आहे. सोशल मीडियावर या मुर्तींचे फोटो सध्या व्हायरल होत आहे.

अयोध्येतील राम मंदिराबाहेर गज, सिंह, हनुमान आणि गरुडाच्या मुर्तींची स्थापना स्थापना करण्यात आली. फिक्या गुलाबी रंगाच्या या मुर्ती अतिशय आकर्षक दिसतात. राजस्थानच्या बंसीपहाडपूर गावातून हे दगड अयोद्धेत आणण्यात आले. या दगडाला बलुआ दगड म्हणतात. बलुआ दगडाच्या या मुर्तींनी राम मंदिराची शोभा वाढवली आहे.

## काँग्रेसचा अपेक्षाभंग? क्राऊड फंडिंगमधून जमले फक्त ११ कोटी; हायकमांड टेन्शनमध्ये

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेस पक्षाला निधीची कमतरता भासत आहे. यामुळे पक्षाने गेल्याच महिन्यात लोकांकडून पैसे गोळा करण्याची मोहिम सुरु केली होती. पक्षाच्या सभांमधील खुर्च्यांनादेखील बारकोड चिकटविले होते. सोशल मीडियावरून आवाहन केले जात होते. एवढे करूनही काँग्रेसकडे फक्त ११ कोटी रुपयेच जमले आहेत. यामुळे काँग्रेसच्या हायकमांडचा हिरमोड झाला आहे. आता यातून सावरण्यासाठी पक्षाने कार्यकर्त्यांना पुढचे आदेश दिले आहेत.




कमी प्रमाणावर देणगी जमा झाल्याने हायकमांडने नाराजी व्यक्त केली आहे. तसेच कार्यकर्ते आणि नेत्यांना प्रयत्न वाढविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दोन आठवड्यांत ११ कोटी रुपयांची देणगी पुरेशी नसल्याचे राहुल गांधी, खर्गे आणि प्रियंका गांधी यांचे मत आहे. आणखी मोठ्या प्रमाणावर पैसे जमा करण्यासाठी प्रयत्न वाढवायला हवेत अशा सूचना या नेत्यांनी केल्या आहेत.

एआयसीसीचे खजिनदार अजय माकन यांना या सूचना करण्यात आल्या आहेत. पक्षासाठी जास्त पैसे जमविण्यासाठी राज्याच्या संघटनांना संपर्क साधा असे सांगण्यात आले आहे. तसेच १४ जानेवारीपासून सुरु होत असलेल्या भारत जोडो यात्रेसाठी आणखी वेगळा पैसा जमा करण्यास सांगितले आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी प्रचाराची साधनसामुग्री जमविण्यासाठी काँग्रेसने १८ डिसेंबरला 'देशासाठी देणगी' मोहिम सुरु केली होती. यावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी १.३८ लाख रुपये देणगी देऊन पक्षाच्या ऑनलाइन क्राउडफंडिंग कार्यक्रमाची सुरुवात केली होती.

## पुण्यातील कुख्यात गुंड शरद मोहोळवर गोळीबार

### उपचारादरम्यान मृत्यू, कोथरुडमध्ये घडला थरार

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

पुण्यातील कुख्यात गँगस्टर शरद मोहोळ याच्यावर पुण्यातील कोथरुड परिसरात गोळीबार करण्यात आलाय. शरद मोहोळ कोथरुडमधील सुतारदरा या ठिकाणी जात असताना दुचाकीवरुन आलेल्या अज्ञातांनी त्याच्या दिशेने तीन गोळ्या झाडल्या. त्यातील एक गोळी शरद मोहोळ त्याच्या खांद्याला लागली. गंभीर जखमी झालेल्या शरद मोहोळवर कोथरुडमधीलच खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. परंतु उपचारादरम्यान शरद मोहोळचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. गुंड शरद मोहोळ याच्यावर झालेला हा जीवघेणा कुणा केला ? हा हल्ला एखाद्या टोळीने अथवा पूर्ववैमन्यस्यातून झाला का?



याची अद्याप कोणताही माहिती समोर आलेली नाही. पोलिस या घटनेचा कसून तपास करत आहे.

शुक्रवारी भरदुपारी कोथरुडमध्ये दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास हा संपूर्ण प्रकार घडला आहे. गोळ्या झाल्यानंतर आरोपी पसार झाले आहेत. हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी तपास पथके रवाना करण्यात आल्याची माहिती कोथरूड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक हेमंत पाटील यांनी दिली. कोथरुडमधील सुतारदरा या ठिकाणी घडलेल्या या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली. पोलिसांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी सुरु केली आहे. पूर्ववैमन्यास्यातून गोळीबार झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. गोळीबार झाल्यानंतर कोथरुड परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालेय.

## अनाथांची माय सिंधुताई सपकाळ यांची पुण्यतिथी चिखलदरात साजरी

### बहुसंख्येने स्थानिकांची उपस्थिती : चिखलदरा ही डॉक्टर सिंधुताई सपकाळ यांची कर्मभूमी

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा**

पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांनी स्थापन केलेल्या प्रथम मुलींचे आश्रम व या ठिकाणावरूनच त्यांनी आदिवासी गवळी तसेच मेळघाटातील स्थानिकांसाठी १९८० च्या दशकात मेळघाटातील आदिवासींच्या हक्कासाठी लढा उभारला आणि गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी त्या अनेक वर्षे लढत राहिल्या अशा त्यांच्या कर्मभूमीत चिखलदऱ्यात त्यांनी स्थापन केलेल्या मुलींच्या आश्रमात त्यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली तसेच मुलींसाठी शिक्षणाची दरवाजे खुल्या करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांची जयंती सुद्धा या ठिकाणी सादरी



करण्यात आली विशेष म्हणजे या कार्यक्रमात सर्वात पुढे आश्रमातील मुलींना बसविण्यात आले होते या कार्यक्रमाला आश्रमातील बहुसंख्येने मुली उपस्थित होत्या तसेच त्यांनी वर्धा येथे स्थापन केलेल्या मुलांची वस्तीगृहातील मुले सुद्धा या ठिकाणी उपस्थित होती हे विशेष याप्रसंगी मान्यवरांनी पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांनी मेळघाटात केलेल्या कामाचा उजाळा याप्रसंगी केला तसेच माईंनी मेळघाटात कामाची सुरुवात कशी केली आणि कोण कोणते कामे केले माईंनी अक्षरशा मेळघाट पिंजून काढला होता व त्यांनी मेळघाटातील आदिवासी बांधवांसाठी व गवळी बांधवांसाठी व्याघ्र प्रकल्पाशी लढा दिला होता त्यावेळी त्यांच्यावर गुन्हे सुद्धा दाखल करण्यात आले होते मात्र सिंधुताई सपकाळ यांनी स्थानिकांच्या हक्कासाठी मोठा लढा दिला होता असे अनेकांनी आपल्या भाषणात त्यांच्या संघर्ष गाथा मांडल्या व त्यांचे चिरंजीव अरुण भाऊ सपकाळ यांनी प्रस्ताविक भाषणात बोलतांनी म्हणाले की आईचा वसा पुढील नेणार असून त्यांच्या पावलावर पाऊल टाकून समाजकार्य पुढे नेणार असल्याचे सांगितले तसेच बोलताना म्हणाले की सिंधुताई सपकाळ यांनी आयुष्यभर अनाथ मुलांसाठी झटत राहिल्या वेळप्रसंगी अनाथ मुलांसाठी भीकही मागितली व अनाथ मुला मुलींना जगविले आयुष्यभर त्या अनाथांना जगविण्यासाठी व अनाथांचे संसार फुलविण्यासाठी संघर्ष करीत राहिल्या असे प्रस्ताविक पर भाषणात अरुण भाऊ सपकाळ यांनी सांगितले तोच वसा पुढे घेऊन जाण्यासाठी माझा प्रयत्न राहील

याप्रसंगी प्रामुख्याने महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष हिरामण जी आप्पा गवळी माजी आमदार प्रभूदाजी भिलावेकर गवळी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष सदाशिव खडके ,अभिमान डोईजड धनंजय कानबाले जिल्हा महासचिव ,अशोक मंडले ,सुदर्शन वैराडकर ,प्रवीण हुंडीवाले गोपालजी कडू ,बाळकृष्ण अंजनगावकर, सुभाष सोनोरे ,वैरागी बाबा ,राजेश गवळी,दीपक खताडे, शेखर काळे,धनराज निपाने, किशोर गाडेकर,उद्धव गाडेकर,निलेश मुधोळकर,इत्यादी उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे उत्कृष्टपणे संचालन संदीप सावरकर यांनी केले या कार्यक्रमाचे आयोजन अरुण सपकाळ अध्यक्ष सिंधुताई सपकाळ आश्रम चिखलदरा यांनी केले.

## मराठा अन् ओबीसी समाज आझाद मैदानासाठी आग्रही; पोलिसांकडे परवानगीसाठी पत्र, परवानगी कोणाला मिळणार?

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मराठा आणि ओबीसी समाज आझाद मैदानासाठी आग्रही आहेत. दोन्ही समन्वयकांकडून मुंबई पोलिसांकडे परवानगीसाठी पत्र पाठवण्यात आलं आहे. त्यामुळे आंदोलनासाठी मुंबई पोलिसांकडून परवानगी कोणाला मिळणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. दरम्यान, २० जानेवारीला मराठा आणि ओबीसी समाजाचं आंदोलन होणार आहे. दोन्ही समाजाच्या समन्वयकांनी आझाद मैदानात आपल्याला परवानगी मिळावी, यासाठी पत्र व्यवहार केलेला आहे. दोन्ही समाजाचे समन्वयक आझाद मैदान आंदोलनसाठी सोयीस्कर असल्यामुळे आग्रही आहेत. त्यामुळे आता आझाद मैदान पोलिसांकडे दोन्ही समाजाचे पत्र आंदोलनासाठी परवानगी मागण्यासाठी आलेले आहेत. त्यामुळे आता पोलीस परवानगी कोणाला देतात? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या आंदोलनासाठी मुंबईत तिन मैदानांच्या परवानगीसाठी शिष्टमंडळानं परवानगी मागितली आहे. मुंबई पोलिसांकडे मनोज जरांगे यांच्या शिष्टमंडळानं आंदोलनासाठी पत्र व्यवहार केला आहे. यामध्ये आझाद मैदान, छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदान आणि बीकेसी वांद्रे मैदानासाठी परवानगी मागण्यात आली आहे. २० जानेवारीला जरांगे यांच्या नेतृत्वात आंदोलन होणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत मनोज जरांगे पाटील यांच्या शिष्टमंडळानं मुंबईत येऊन काही मैदानांची पाहणी करत मुंबईतील समन्वय समितीसोबतही चर्चा केली आहे. त्यात आता काहीच दिवस शिल्लक असल्यानं मुंबईतील सकल मराठा समाजाचे समन्वयक हे मनोज जरांगे पाटील यांना भेटण्यासाठी जालन्याला गेले होते.

मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आपल्या सर्व समन्वयकांना तयारी करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर परवानगीसाठी पत्रव्यवहार आणि इतर तयारी देखील आता मुंबईतील समन्वयक करत आहेत.

## वाघोली शेतशिवारात बिबट्याने केली गाय ठार

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

मलकापूर शेतशिवारात बिबट्याने शेतात बांधलेल्या कालवडीची शिकार केल्याची घटना मंगळवारी (ता. दोन) रात्री घडली. त्या पाठोपाठ बुधवार रोजी रात्री कुणबी वाघोली शेतशिवारात बिबट्याने एक गाय ठार केल्याने शेतकर्यांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. कालवडीच्या मृत्यूने शेतमालक नीलेश दोतोंडे व पंकज डवरे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. परिसरातील अनेक शेतकरी आपल्या पशुंना जाग्यावरच मुबलक चारा व पाणी उपलब्ध व्हावा, याकरिता शेतात बांधून ठेवतात. अशातच मागील काही दिवसांपासून वाघडोह- मलकापूर शेतशिवारात बिबट व अस्वल यांचे एकसारखे दर्शन शेतकर्यांना घडत आहे. वनविभागाच्या अधिकार्यांनीही त्यांच्या प्रत्यक्ष वावराबद्दल शिक्कामोर्तब केले आहे. देवगावचे जंगल जवळच असल्याने बिबट, अस्वल यांचा कायम या ठिकाणी वावर असतो.

## दाऊद इब्राहिमच्या मालमत्तांचा उद्या होणार लिलाव

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई, ७**

अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या चार वडिलोपार्जित मालमत्तांचा लिलाव उद्या म्हणजेच शुक्रवारी होणार आहे. या चार मालमत्तांचा स्मगलर्स अँड फॉरेन एक्स्चेंज मॅनिप्युलेटर्स (जप्ती मालमत्ता) प्राधिकरण द्वारे लिलाव केला जाईल. दाऊद इब्राहिम कासकरच्या या वडिलोपार्जित मालमत्ता महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील मुंबके गावात आहेत. मुंबके हे दाऊद इब्राहिम कासकरचे वडिलोपार्जित गाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ज्या चार मालमत्तांचा लिलाव होणार आहे, त्यांची किंमत १९.२ लाख रुपये ठेवण्यात आली आहे. याआधीही २०१७ आणि २०२० मध्ये दाऊदच्या १७ हून अधिक मालमत्तांचा लिलाव झाला होता. दाऊद इब्राहिम आणि



त्याच्या कुटुंबातील सदस्यांविरुद्ध तस्करी आणि एनडीपीएस (नार्कोटिक ड्रग्स आणि सायकोट्रॉपिक सबस्टन्स) कायद्याशी संबंधित प्रकरणांमध् सक्षम अधिकाऱ्याने या मालमत्ता जप्त केल्या होत्या. रत्नागिरी जिल्ह्यात लिलाव होणार्या चारही मालमत्ता दाऊद इब्राहिम कासकरची आई अमिनाच्या नावावर आहेत. या मालमत्तेसाठी अनेक निविदा प्राप्त झाल्या असून ५ जानेवारी रोजी दुपारी २:०० ते ३:३० या वेळेत बोली प्रक्रिया पार पडणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मागील वेळी म्हणजे २०१७ मध्ये, ने दाऊदच्या मालमत्तेचा यशस्वीपणे लिलाव केला होता, ज्यात हॉटेल रौनक अफरोज, शबनम गेस्ट हाऊस आणि भिंडी बाजारजवळील डमरवाला इमारतीच्या सहा खोल्या होत्या.

माहितीनुसार, २०१७ मध्ये झालेल्या लिलावातून ला ११ कोटी रुपये मिळाले होते. सुमारे ३ वर्षानंतर म्हणजेच २०२० मध्ये दाऊदच्या मालमत्तेचा पुन्हा एकदा लिलाव करण्यात आला, ज्यातून ला २२.७९ लाख रुपये मिळाले. नुकतेच काही मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात आला होता की दाऊद इब्राहिम कासकरची तब्येत ठीक नाही आणि त्याला पाकिस्तानमधील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या या वृत्ताला दुजोरा मिळालेला नाही.

## १२-१२ जागांचा प्रस्ताव घेऊन एकत्र या, म्हणजे तुमचे १२ वाजवायला सोपं जाईल

### रामदास आठवलेंचा महाविकास आघाडीला टोला

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक सांगली**

पंतप्रधान नरेंद्र मोदींना हरवण्यासाठी सर्व पैलवान एकत्र आले आहेत. मात्र, सर्व पैलवानांना आम्ही चितपट करू, असा इशारा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी दिला. राज्यात वंचितने १२-१२ जागांचा प्रस्ताव दिला आहे, हा प्रस्ताव चांगला आहे, त्यामुळे चारही पक्षांनी १२-१२ जागा घ्याव्यात, म्हणजे आम्हाला त्यांचे १२ वाजवता येतील, असा टोलाही रामदास आठवलेंनी लगावला. ते सांगलीमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते. देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्रमध्येच गरज असून दिल्लीत फडणवीस यांनी



येण्याची गरज नाही, असेही ते म्हणाले. शिर्डीमधून निवडणूक लढवू इच्छित असल्याचेही त्यांनी सांगितले.

एनडीएमधून आम्ही मोदींच्या नेतृत्वाखाली निवडणूकला सामोरे जाऊ आणि ४०० पेक्षा जास्त जागा आम्हाला मिळतील, इंडिया आघाडीने कितीही प्रयत्न केला तरी त्यांना यश मिळणार नाही. रिपब्लिकन पक्षाला २ तरी जागा द्याव्यात ही माझी मागणी असल्याचे त्यांनी सांगितले. मंत्रिमंडळ विस्तारात एक मंत्रिपद मिळावे, त्यासाठी विस्तार करण्याची आमची मागणी आहे. राम मंदिर अनेक वर्षांपासून प्रलंबित होता, बाबरी मशीदच्या जागी मंदिर होते. राम मंदिर उद्घाटन सोहळा भाजपचा नाही, ट्रस्टचा हा सोहळा आहे. आदर आहे त्यांनी अयोध्या मध्ये दर्शनासाठी जावे. निमंत्रण येण्याची शक्यता आहे, तेव्हा जाऊ, मी सर्वधर्म मानणारा असल्याचे ते म्हणाले.

## संपादकीय ......

# 'नो रिक्स,नो गेम,नो सक्सेस'

*इंग्रजीत एक म्हण आहे- 'नो रिस्क, नो गेमा या स्पर्धेच्या युगात ही म्हण आणखी विस्तारता येईल. नो रिस्क, नो गेम, नो सक्सेस: जर तुम्ही जोखीम घेतली नाही, तर तुम्हाला काहीही मिळणार नाही. जेव्हा आपण जबाबदारी घ्यायची टाळतो, त्यावेळी आपण कुठलाही निर्णय घेऊ शकत नाही आणि आलेल्या अपयशाबद्दल इतरांना दोषी ठरवून आपण आपल्या चुकांपासून काही शिकत नाही. आपण अपयशाची कारणमीमांसा प्रामाणिकपणे केली आणि कॅलक्युलेटेड रिस्क घेऊन प्रयत्न केले, तर यशस्वी होण्यापासून तुम्हाला कोणीच रोखू शकणार नाही.*

*संधी नेहमी अस्तित्वात असते; पण ती पाहणा-याला दिसते आणि तिला धीटपणे उचलणाऱ्याला ती वश होते. जे लोक डोळसपणे संधी पाहतात, त्यांनाच ती दिसते. खूपवेळा संधी खुणावत असते, पण माणूस घाबरुन संधी पकडत नाही. संथीला संकट समजून माणूस संधीपासून पळ काढतो. जीवनात येणारा प्रत्येक क्षण ही आपल्याला मिळालेली संधी असते. आपल्या भाग्योदयासाठी चांगला उपयोग करायचा, की संधी सोडून वेळ वाया घालवायचा, हे शेवटी तुमच्यावर अवलंबून असते. संधी नुसती दिसून उपयोगी नाही, तर तिला धरून वापरली, तरच ती फायदेशीर ठरते.*

*माणसाच्या दुःखाचे, निराशेचे कारण तो पुढे येण्यासाठी संधी शोधत नाही, यात आहे. जेव्हा आपण संथी पकडतो, तेव्हा त्यात जोखीम असते. अशावेळी एक तर आपल्याला यश येते किवा अपयश येते. पण जो कधी संधी शोधत नाही, तिचा पाठलाग करीत नाही, त्याला यश कधीच येत नाही. संधीच्या बाबतीत आपले खूप गैरसमज आहेत. काही म्हणतात, संधी आयुष्यात एकदाच दरवाजा ठोठावते, संथी ही आपला काका, मामा मोठ्या पदावर असेल, तर विनासायास मिळते. संधी आपण होऊन वाढून यावी लागते आणि नशीब असेल तरच ती चाटून येते या सर्व कल्पना चुकीच्या आहेत. बातमीदारांना बातम्या जशा सोर्सेसशिवाय मिळत नाहीत तसेच संधीचेही. इतरांशी केलेली चर्चा, गप्पागोष्टी, वाचनाचा छंद असेल तर पुस्तके, पर्यटनाची हौस असेल तर निसर्ग, यातून संधी शोधता येते. कारण प्रवास संधीला हितकारक असतो, तर डोळस निरीक्षक संधीला उपकारक ठरतो. वाचनाचा छंद संधीला दिशा दाखवतो. दुसऱ्याच्या अनुभवातून आणि अपयशातूनसुद्धा संथी शोधता येते. संधी शोधणारे आणि तिचा फायदा घेणारे, लोक काय म्हणतील याची तमा बाळगत नाहीत. नवनवे विचार नव्या कल्पनांना जन्म देतात, अन् या नवकल्पनांमधून नवोन्मेष असणारे स्टार्टअप आकारास येतात. सध्या जे तरुण नावीन्यपूर्ण संकल्पनांचा अवलंब करून मोठमोठे उद्योग सुरू करीत आहेत, भविष्य त्यांची वाट पहात आहे. संधी आपोआप त्यांच्या पायाशी लोळण घेत आहे त्यामुळे एखादी नवी कल्पना तुमच्या डोक्यात आली, तर तिला वाट मोकळी करून द्या. तिला वाट दिली, तर कितीतरी प्रश्नांची उत्तरे तुम्हाला मिळतील आणि संधी आपोआप मिळेल.बहुसंख्य लोक आयुष्यात कोणतेच ध्येय न ठेवता जगत असतात. त्यांचे आयुष्य समुद्रात शिडाअभावी भरकटलेल्या जहाजासारखे असते. आपल्याला काय करायला हवे, कोणत्या गोष्टीला आयुष्यात महत्त्व द्यायला हवे, कोणाला अग्रक्रम द्यायला हवा, हे ज्याचे त्याने ठरवायला हवे. अग्रक्रम आणि दिरंगाई याचे हाडवेर आहे. अनेक लोक जीवनात कोणते काम अतिमहत्त्वाचे, कोणते थोडे महत्त्वाचे, कोणते काम उद्या केले तरी चालेल, यातला फरक ओळखू शकत नाहीत. प्रत्येक गोष्टीत ते दिरंगाई करतात आणि वेळ निघून गेली, की पश्चाताप करतात. दिरंगाई ही खूप वेळा इतकी महागात पडते, की आयुष्यभर केलेली मेहनत क्षणात नाहीशी होते. कुठल्याही गोष्टीची दिरंगाई, चालढकल हे रोगट मनोवृत्तीचे लक्षण आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांनी या सर्व गोष्टी ध्यानात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.*

# समाजाला दिशादर्शक विषयांवर मंथन होणे आवश्यक - आ.यशोमती ठाकूर

## स्व.माणिकराव घवळे वादविवाद स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** आज समाजात वेगवेगळ्या विषयावरून मतभेद आहेत. चांगला विचार समाजात रुजविण्यासाठी आवश्यक अशा विषयावर कोणीही चर्चा करताना दिसून येत नाही. आरक्षणासारखा गंभीर विषय तरुण पिढीला अभ्यासपूर्वक मांडता यावा यासाठी या वादविवाद स्पर्धेच्या माध्यमातून एक चांगले विचारपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न हा कौतुकास्पद आहे. समाजाला दिशादर्शक ठरतील अशा सामाजिक विषयांवर मंथन होणे काळाची गरज असल्याचे मत माजी मंत्री तथा आ. यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केले.



डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय आणि स्व.माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त माध्यमाने आयोजित स्व.माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन आज आ.यशोमती ठाकूर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, माजी कोषाध्यक्ष हरिहर ठाकरे, प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख, प्रफुल्ल घवळे आदी मान्यवरांची विचारपीठावर उपस्थिती होती.

स्वागतपर भाषणातून प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांनी स्पर्धा व महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी बोलतांना हेमंत काळमेघ म्हणाले की अमरावती येथे विधी अभ्यासक्रम सुरू करताना ज्यावेळी नागपूर विद्यापीठाकडून प्रथमतः अभ्यासक्रम नाकारण्याचा प्रयत्न झाला त्यावेळी संविधान सभेची बैठक सोडून भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांनी नागपूर विद्यापीठात शिवाजी महाविद्यालयात विधी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी महत्त्वपूर्ण युक्तिवाद केला होता. या युक्तिवादामुळेच संस्थेला केवळ एकाच वर्षात विधी आणि वाणिज्य या ज्ञानशाखा सुरू करता आल्या आहेत. चांगले युक्तिवाद होण्यासाठी चांगले विचार आणि अभ्यास आजच्या पिढीत रुजणे आवश्यक आहे. ते काम महाविद्यालय आणि स्पर्धेचे आयोजक उत्तमरीत्या करीत असल्याचे मत हेमंत काळमेघ यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणातून दिलीप इंगोले यांनी म्हटले की, गेल्या २२ वर्षांपासून सातत्याने वादविवाद स्पर्धेच्या माध्यमातून प्रफुल्ल घवळे व त्यांच्या आयोजन समितीमधील सदस्य निश्चितपणाने वेगवेगळ्या विषयांवर स्पर्धा घेऊन सामाजिक प्रबोधन करत आहेत. आणि यामधून अनेक वक्ते घडत असल्याचा अभिमान सुद्धा आहे. या स्पर्धेच्या मी गेल्या २२ वर्षांपासून साक्षीदार असून या प्रेरणादायी उपक्रमाची त्यांनी प्रशंसा केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रफुल्ल घवळे यांनी केले तर संचालन रत्नाकर शिरसाठ व आभार मयूर चौधरी यांनी मानले.

आर्थिक निकषांवर आधारित राजकीय आरक्षण देशहिताचे आहे या विषयांवर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली होती. स्पर्धेमध्ये राज्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते.उदघाटन समारंभाला विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# आता 'बाबर' पूजकांनाही 'राम' आठवतो आहे !

# नाही तर 'राम नाम सत्य है'!

*श्रीरामजन्मभूमी मुक्ती आंदोलनाला त्यावेळी विरोध करणारे आज श्रीरामललाच्या प्राणप्रतिष्ठेच्या सोहळ्याला आपल्याला बोलवले गेले पाहिजे म्हणून डोळ्यात प्राण आणून वाट पाहात बसले आहेत. एकीकडे स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणायचे, गठ्ठा मतांसाठी लांगुलचालन करायचे आणि दुसरीकडे रामभक्त असण्याचा आव आणायचा. रामविरोधी कंपूवर दुर्दैव ओढवले आहे. पाहवतही नाही आणि टाळताही येत नाही ही त्यांची अवस्था हाच संघटित हिंदू शक्तीचा विजय आहे.*

*ज्या मुलायमसिंहांनी रामभक्तांवर गोळ्या झाडल्या त्यांचे सुपुत्र अखिलेश यादव म्हणतात अगर रामललाने बुलाया तो जरूर जाएंगे. ज्यांनी आजवर प्राणपणाने या देशात बाबर जपला, जिवंत ठेवला ते रामललाच्या दर्शनासाठी उतावीळ झाले आहेत. कारसेवेत व अयोध्या आंदोलनात कवडीचाही सहभाग नसलेल्या उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी सामनातून अग्रलेख लिहून आपल्या नव्या 'धन्या'ला रामभक्त ठरवण्याचा केविलवाणा व हास्यास्पद प्रयत्न केला आहे. सामनाने काँग्रेसला चक्क हिंदुत्ववादी पक्ष म्हणून मान्यता दिली आहे. ज्यांनी सत्तेसाठी हिंदुत्व सोडले ते काँग्रेसवर हिंदुत्ववादी असल्याचे शिक्कामोर्तब करू पाहत आहेत. ज्या काँग्रेसने श्रीरामजन्मभूमी मुक्ती आंदोलनाला टोकाचा विरोध केला, ज्यांनी मर्यादापुरुषोत्तम श्रीरामाचे अस्तित्वच नाकारले, ज्यांनी सहिष्णू हिंदूंना दहशतवादी ठरवण्याची योजना आखली, ज्यांनी हिंदुत्व चिरडण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले, हिंदुत्व द्वेषापायी आजही जे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या देशभक्तीवर प्रश्नचिन्ह उभे करून त्यांच्या त्यागाची चेष्टा करतात, रामभक्तांवर गोळ्या चालवताना ज्यांना कळवळा आला नाही, गोधरा मध्ये रामभक्तांना जिवंत जाळण्याचा मुद्दा ज्यांना अल्पसंख्यांकांची मते मिळवण्यासाठी लाभाचा वाटला, धर्मासाठी लढलेल्या शीख समूहाचे शिरकाण करताना जे अग्रभागी होते, त्या काँग्रेसला उद्धव ठाकरे आणि 'घमंडीया' आघाडीचे विश्वप्रवक्ते संजय राऊत हे हिंदुत्ववादी ठरवू पाहत आहेत. काँग्रेसपेक्षाही जास्त कीव तर उद्धव ठाकरे यांची येते. प्रथम त्यांनी रामभक्तांवर गोळ्या चालवणाऱ्या मुलायमसिंहांच्या पक्षाशी हातमिळवणी केली. आता स्वतःची लाज वाचवण्यासाठी काँग्रेसने हिंदूंवर किती आणि कसे उपकार केले आहेत, याची कपोलकल्पित गाथा मांडली आहे. एकेकाळी मला गाढव म्हणा पण हिंदू म्हणू नका, असे जाहीरपणे म्हणणारे ठाकरेंना हिंदुत्ववादी दिसू लागले आहेत.*



*उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी काँग्रेसला अयोध्येला जाण्याचा सल्ला दिला आहे. कोरोना काळात उद्धव ठाकरे यांनी डब्ल्यू एच ओ ला सल्ला दिला होता, असे संजय राऊत सांगतात.*

*उष्ट्राणां च विवाहेषु गीतं गायन्ति गर्दभाः ।*

*✻परस्परं प्रशंसन्ति अहो रूपम् अहो ध्वनिः ।।*

*उंटांच्या विवाह सोहळ्यात गाढवं गीत गातात आणि मग ते परस्परांची प्रशंसा करतात, गाढव उंटाला म्हणतो 'काय रूप आहे तुमचे!' आणि उंट गाढवाला म्हणतो 'काय सुरेल आवाज आहे हो तुमचा! अशी राऊत आणि उद्धव यांची गत आहे.✻ डब्ल्यू एच ओ ने तसे कधी स्पष्ट केले नाही. तात्पर्य, कोणीही न मागता सल्ले देण्याची सवय त्यांना जडली आहे. काँग्रेसने या सल्ल्याला किती गंभीरतेने घेतले याचे स्पष्टीकरण अद्यापि काँग्रेसकडून आलेले नाही. जागावाटपावरून काँग्रेसने संजय निरूपम यांना समोर करून उबाठा सेनेला त्यांची जागा दाखवण्याचा प्रयत्न नुकताच केला आहे. सोनिया गांधी, खर्गे आणि राहुल गांधी यांनी उबाठा सेनेच्या सल्ल्याला किती गंभीरतेने घेतले, हे लवकरच स्पष्ट होईल. त्यांनी न मागितलेला सल्ला न ऐकल्यास त्याला केराची टोपली दाखवल्याचा अर्थ सांगण्याची आवश्यकता नाही.*

*मुंब्राच्या जितेंद्र आव्हाड या नतद्रष्ट माणसालाही आज राम आठवला. राम मांसाहारी होता म्हणून आम्ही मटण खात असल्याची मुक्ताफळे आव्हाडांनी उधळली. कायम मांसाहारी आणि राममंदिर डोळ्यात सलणाऱ्या शरद पवारांची तळी उचलणाऱ्या आव्हाडांनी अशीच गरळ ओकणे अपेक्षित होते. उद्धव ठाकरे आणि संजय राऊत अशावेळी मूग गिळून बसतात. कोथळा, वाघनखे, बुरुज, मर्द, नामर्द, हा शब्दकोश अशावेळी त्यांना आठवत नाही. मंदिरात जात नसतो म्हणणाऱ्या पवारांनाही उद्धव आणि राऊत यांनी सल्ला दिला पाहिजे. आता फक्त मर्यादापुरुषोत्तम श्रीरामाला जातीच्या चौकटीत बसवणे शिल्लक होते. आव्हाडांनी आज तोही केविलवाणा प्रयत्न केला. श्रीरामाची जात काढून आपल्या बुद्धीचे दौर्बल्य त्यांनी दाखवले. बाबरी मशिदीसाठी अश्रू ढाळणाऱ्या कंपूच्या डोक्यात राममंदिरच भिनले असणे, हा देखील या दीर्घकालीन लढ्याचा विजय आहे. कारसेवकांच्या सांडलेल्या रक्ताचा हा विजय आहे. श्रीरामजन्मभूमी मुक्ती संग्रामात जो कंपू बाबराला पूजत होता तोच कंपू आज 'रामनाम' जपण्यासाठी तयार आहे.*



**शिवराय कुळकर्णी**
**प्रवक्ता, भाजपा, महाराष्ट्र**
**९८८१७१७८२७**

*✻'जो हिंदू हित की बात करेंगा - वोही देशपर राज करेंगा' हा देशाचा मूड आहे. संपूर्ण देश २२ जानेवारीला दिवाळी साजरी करण्याच्या तयारीला लागला आहे. या परिस्थितीत श्रीरामाला अव्हेरणे म्हणजे आपले 'राम नाम सत्य है !' झाल्याखेरीज राहणार नाही, याची पुरेपूर जाणीव या कंपूला झाली आहे.✻ आज केंद्रात रामभक्तांचे सरकार आहे. श्रीरामजन्मभूमी मंदिराचा संकल्प केलेले नरेंद्र मोदी पंतप्रधान आहेत. या सोहळ्याला नख लावण्याचा प्रयत्न मोदी विरोधक प्राणपणाने करणार आहेत. पण देश रामललाच्या स्वागतासाठी सज्ज झाला आहे. रामललाचे अभूतपूर्व, ऐतिहासिक, नेत्रदीपक स्वागत होणार आहे.*

***ये हर दिल की तमन्ना है,***
***तुम्हे महलो मे हम देखे,***
***इन आखोंसे मेरे रघुवर,***
***तेरे मंदिर को हम देखे,***
***दुआओ का असर है,***
***अवध मे राम आये है !***




## कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी आहारात या ४ गोष्टींचा करा समावेश

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

धावपळीच्या जीवनशैलीमुळे अरोग्याकडे प्रत्येकाचं दुर्लक्ष होत आहे. व्यायाम करायला देखील वेळ मिळत नाहीये. वेगवेगळ्या आजारांचा सामना करावा लागतो. वयानुसार हे आजार देखील वाढत जातात. आता तर तरुण वयात देखील हृदयविकाराचा झटका, मधुमेह आणि कमी रक्तदाब अशा समस्या पुढे येत आहेत. चुकीच्या आहारामुळे वाढणारे कोलेस्ट्रॉल हे यामागचे एक कारण आहे. तुम्ही देखील वाढलेल्या कोलेस्ट्रॉलमुळे त्रस्त असाल तर आज या लेखात आम्ही तुम्हाला अशा काही गोष्टींबद्दल सांगणार आहोत जे तुमच्या शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढू देणार नाहीत.



**ओट्स**- कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी तुम्ही आहारात ओट्सचा समावेश केला पाहिजे. ओट्ससोबत केळी आणि स्ट्रॉबेरीही खाऊ शकता.

**नट्स**- वाढलेली कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यासाठी नट्स देखील मदत करतात. बदाम, पिस्ता आणि काजू यांसारखे नट केवळ कोलेस्ट्रॉल कमी करत नाहीत तर हृदयासाठीही चांगले असतात.

**सोया**- कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी सोयाबीन किंवा सोया मिल्कचा तुमच्या आहारात समावेश करु शकता. एका आठवड्यासाठी दररोज किमान २५ ग्रॅम सोया प्रोटीनचे सेवन केल्यास कोलेस्ट्रॉल कमी होऊ शकते.

**लाल मसूर**

मसूर आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. कारण त्यात फायबर मुबलक प्रमाणात आढळते. ज्याचे प्रमाण ७.८ ग्रॅम आहे. हे कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी प्रभावी आहे.

# आंदोलने, मोर्चांवर 'अवेअरनेस ऑफ व्हील' चा राहणार वॉच

## शहर पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या कल्पक नेतृत्वातून हे दोन नवोपक्रम गेले साकारले

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:-** भारत सरकार तर्फे २ जानेवारी १९६१रोजी महाराष्ट्र पोलीस दलाला पोलीस ध्वज प्रदान करण्यात आला होता. त्या अनुषंगाने २ ते ८ जानेवारी दरम्यान महाराष्ट्र पोलीस दलातर्फे पोलीस वर्धापन दिन साजरा केला जातो. यामध्ये विविध उपक्रम राबवून जनजागृती केली जाते. त्या मालिकेत अमरावती शहर पोलीस दलातर्फे शहरातील नागरिकांसाठी 'अवेरनेस ऑन व्हील' व 'स्मार्ट ई-बिट सिस्टिम'दोन आधुनिक तंत्रज्ञान युक्त उपक्रम सुरु करण्यात आले आहेत. शहर पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या कल्पक नेतृत्वातून हे दोन नवोपक्रम साकारले गेले आहेत. 'वेरनेस ऑन व्हील' या प्रकल्पातील वाहन सिसिटिव्ही सरव्हायलंस' युक्त असून त्यावर एलईडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्हे जनजागृती, महिला व बालकांविषयी संरक्षण कायद्याची माहिती तसेच नागरिकांसाठी पोलीस विभागातील सुविधांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच शहरात घडणारे विविध आंदोलने, मोर्चे, सभा तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या प्रसंगी प्रभावी पर्यवेक्षण ठेवण्याकरीता या वाहनाचा उपयोग होणार आहे.




### 'स्मार्ट ई- बिट सिस्टिम'मध्ये 'एआय'

'स्मार्ट ई- बिट सिस्टिम'मध्ये बिट मार्शल पेट्रोलिंगचे सनियंत्रण तसेच व्यवस्थापन केले जाणार आहे. त्यासाठी एआय अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स' व 'जिओ टॅगिंग'ची मदत घेण्यात येणार आहे. या प्रकल्पा अंतर्गत शहरातील महत्वाचे ठिकाणे शाळा, महाविद्यालये गुन्हे प्रवण ठिकाण व निर्जन स्थळावर पोलिसांचा सतत वावर व अस्तित्व उपलब्ध होणार आहे.

# ‘मेळघाट हाट’चे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

## महिला सशक्तीकरणासाठी अभिनव उपक्रमांना प्रोत्साहन द्या - पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील





**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, –** मेळघाट क्षेत्रातील स्वयं सहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनाला ‘मेळघाट हाट’ विक्री केंद्राच्या माध्यमातून उत्पादित वस्तू व साहित्याला हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे.

महिलांच्या सशक्तीकरणासाठी अशा अभिनव उपक्रमांना सर्व स्तरावरून प्रोत्साहन द्यावे, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी येथे केले. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने येथील सायन्सकोर हायस्कुलच्या प्रांगणात महिला बचत गटांचे उत्पादन विक्री केंद्राचे उद्घाटन पालकमंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार नवनीत राणा, आमदार राजकुमार पटेल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अधिकारी सुनील सोसे आदी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले, मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला हक्काचे विक्री केंद्र मिळाले आहे. या मॉलच्या माध्यमातून उत्पादित वस्तू थेट ग्राहकांना विक्री करुन बचत गटातील महिलांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

या ठिकाणी ग्राहकांना वनौषधी, बांबूपासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, जंगली मेवा, मध यासारख्या वस्तूंची खरेदी करता येईल. आदिवासी महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी महिला बचत गटांना प्रोत्साहन देऊन आदिवासी क्षेत्रात जास्तीत-जास्त बचत गटांचे जाळे निर्माण करावे.

महिलांची कला-कौशल्ये तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादन वाढवून त्यांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रशासनासोबतच स्वयंसेवी संस्थानी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना योग्य भाव मिळण्यासाठी विक्री साहित्याचे उत्तम मार्केटिंग, पॅकिंग व ब्रँडिंग करणे आवश्यक आहे. यासाठी महिला बचत गटांना प्रशिक्षित करावे. उत्पादित मालांना राज्यसह देशात बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनामार्फत प्रयत्न करण्यात येईल. मेळघाट क्षेत्रातील महिला बचत गटांना प्रोत्साहित करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून आवश्यकतेनुसार कर्ज पुरवठा उपलब्ध करुन देण्याची ग्वाही पालकमंत्री श्री. पाटील यांनी दिली.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पंडा यांनी प्रास्ताविकेत मेळघाट हाटबाबत माहिती दिली. मेळघाटातील धारणी तसेच चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. येथे एकाच छताखाली मेळघाटातील उत्पादित केलेल्या ४७ प्रकारच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. प्रथम टप्प्यात एकूण ६० स्वयंसहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनाचा समावेश करण्यात आला आहे. त्यात बांबूपासून निर्मित विविध उत्पादनांसह तृणधान्यांमध्ये सावा, कुटकी, ज्वारी, बाजरी तसेच कडधान्य, गहू, लाल तांदुळ, तूर दाळ, विविध प्रकारची लोणची, चिखलदऱ्यात उत्पादित होणारी प्रसिध्द कॉफी, मध, तूप, गृहशोभेच्या वस्तू, आरोग्याच्या दृष्टिकोनातून पौष्टिक खाद्यान्ने असे विविध उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध आहेत. येथे गोदाम, पॅकेजिंग, लेबलिंग युनिटसह ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आधुनिक पद्धतीच्या मॉल विक्री केंद्राचे स्वरूप देण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवातीला आदिवासी नृत्य सादर करण्यात आले. त्यानंतर मेळघाट हाट उद्घाटनाच्या कोनशिलेचे अनावरण पालकमंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पालकमंत्र्यांनी मेळघाट हाट मॉलमधील विक्री साहित्याची पाहणी करून याबाबत महिला बचत गटांच्या महिलांकडून माहिती जाणून घेतली. तसेच विविध वस्तूंची खरेदीही केली. कार्यक्रमाचे संचालन व आभार शिप्रा मानकर यांनी मानले.

## आदिवासी व सर्वसाधारण क्षेत्रातील विकास कामे तातडीने पूर्ण करा

### – पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील



**दि५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, –** आदिवासी घटक योजनेंतर्गत जिल्हा परिषद, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, महिला व बाल कल्याण विभाग यांनी सन २०२२-२३ मधील आदिवासी क्षेत्रातील विकास कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी आज येथे दिले.

पालकमंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत विविध विभागांचा आढावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे पाटील, आमदार राजकुमार पटेल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्री. व्यवहारे, मनपा आयुक्त देविदास पवार, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत म्हस्के आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. आदिवासी क्षेत्रात शासकीय विभागांच्या विविध योजना पोहोचविण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत तरतूद करण्यात येते. त्याअंतर्गत आदिवासी घटक योजनेतील सर्व विभागांनी सन २०२२-२३ ची कामे लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी निर्धारित काळात निधी खर्च करुन विकास कामे पूर्ण करावीत. नजिकच्या काळात या विकास कामांची पाहणी करण्यात येईल. पाहणीच्यावेळी लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी तसेच संबंधित यंत्रणाचे विभागप्रमुख उपस्थित राहतील, असे पालकमंत्री श्री. पाटील यावेळी म्हणाले.

सर्वसाधारण योजनेंतर्गत वन विभागाच्या विविध विभागांचा यावेळी आढावा घेतला. आदिवासी विभागातील पेसांतर्गत निधी, कृषी पंपाची विद्युत जोडणी, अमृत आहार योजना आदी विविध योजनांबाबत यावेळी माहिती घेण्यात आली. वन्यजीव व्यवस्थापन व निसर्ग संवर्धन कामे करताना वन विभागाने जिओ टॅगिंग करावे. जेणेकरुन वन विभागामार्फत करण्यात आलेली विकास कामे नागरिकांना ऑनलाईन बघता येईल. येत्या काळात आदिवासी विभागातील कोणत्याही दोन तालुक्यांची निवड करुन त्यांना प्रत्यक्ष भेट देण्यात येईल. त्या अनुषंगाने वन विभागातील विकास कामांचा आढावा प्रशासनामार्फत घेण्यात येईल. केंद्र शासनाकडे वन विभागाचा प्रलंबित विकास कामांचा प्रशासनामार्फत पाठपुरावा करावा, असे श्री. पाटील म्हणाले.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ अंतर्गत वनविभागाच्या पाचही विभागाचा यावेळी आढावा घेण्यात आला. त्याचप्रमाणे सन २०२३-२४ वरील प्राप्त निधी व खर्चाचा आढावाही यावेळी घेण्यात आला. तसेच सन २०२३-२४ चा निधी विहित कालावधीत खर्च होईल, ही दक्षता संबंधित विभागाने घ्यावी, असेही पालकमंत्री यावेळी म्हणाले.

## रामनामातून मतदारांना साद

### प्रत्येक आमदाराला ’टार्गेट अयोध्या’

### ५ हजार भाविकांना दर्शन

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** अयोध्येतील राम मंदिरात श्रीराम प्राणप्रतिष्ठेसाठी जय्यत तयारी सुरू असताना भाजपकडून वातावरणनिर्मिती करण्यावर भर देण्यात येत आहे.



या सोहळ्यानंतर रामनामातून मतदारांपर्यंत पोहोचत जनसंपर्क करण्याचे भाजपकडून नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक आमदाराला त्यांच्या मतदारसंघातून कमीत कमी पाच हजार नागरिकांना अयोध्या मंदिराच्या दर्शनासाठी नेण्याचे टार्गेट देण्यात आले आहे. यासाठी आवश्यक त्या याद्या तयार करण्याच्या सूचनादेखील देण्यात आले आहेत. नागपुरात हिवाळी अधिवेशन काळात झालेल्या भाजपच्या कार्यकारिणी बैठकीत पक्षश्रेष्ठींनी याबाबत सर्व आमदारांना माहिती दिली. अयोध्येतील राममंदिरासाठी विहिंप, संघासोबत भाजप नेत्यांनी देशभरात वातावरणनिर्मिती केली होती. या मुद्यावरून देशाच्या राजकारणाचे चित्रदेखील बदलले आणि सत्तेवर येण्यात भाजपला बराच फायदादेखील झाला. आता इतक्या वर्षांच्या संघर्षानंतर राममंदिर साकारत असताना भाजपने देशपातळीवर त्या निमित्ताने वातावरण निर्मितीचे नियोजन केले आहे. आगामी निवडणुका लक्षात घेता राज्यात भाजपने हा पुढाकार घेतला आहे.

या अंतर्गत राममंदिरात प्राणप्रतिष्ठा झाल्यावर पुढील काही महिन्यांत प्रत्येक आमदाराला त्यांच्या मतदारसंघातील ५ हजार नागरिक अयोध्येला नेण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एकदा यादी तयार झाली की टप्प्याटप्प्याने नागरिकांना अयोध्येत पाठविण्यात येईल. अयोध्येत पक्षाकडून निवास, भोजन, प्रत्यक्ष मंदिरात नेणे इत्यादी बाबींची व्यवस्था करण्यात येईल. त्यासाठी विशिष्ट पदाधिकाऱ्यांना जबाबदारी देण्यात येईल व काही महिने त्यांचा तेथेच मुक्काम असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली. काही पदाधिकाऱ्यांनी अयोध्येत जाऊन एकूण व्यवस्थेचे नियोजनदेखील केले असून देशपातळीवरील मोहिमेचाच हा एक भाग असेल अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

### रेल्वेगाड्याच बुक करणार

राज्यातील विविध मतदारसंघातील लाखो नागरिकांना विधानसभा निवडणुकीपर्यंत अयोध्येला नेण्यात येणार आहे. विविध टप्प्यात हा प्रवास होईल. एकाच मार्गावरील मतदारसंघातील नागरिकांच्या सोयीसाठी रेल्वेगाड्याच बुक करण्यात येणार आहेत. या गाड्यांना ‘रामलल्ला दर्शन विशेष ट्रेन’ असेच नाव देण्यात येणार आहे. नागरिकांचे रेल्वेगाड्यांत आरक्षण करता यावे यासाठी याद्या तयार करण्यावर भर देण्यात येणार आहे.

### खासदारांना २० हजारांचे लक्ष्य

आमदारांसोबतच भाजपने राज्यातील सर्व खासदारांनादेखील विशिष्ट लक्ष्य दिले आहे. त्यांना २० हजार नागरिकांना दर्शन करावयाचे आहे. यासोबतच जेथे भाजपचे आमदार, खासदार नाहीत तेथे लोकसभा किंवा विधानसभा निवडणूक प्रमुख अथवा प्रमुख पदाधिकाऱ्यांना याची जबाबदारी देण्यात आली आहे.

## ९४ बालकांचा ‘टू-डी इको’ केला, ३० जणांना हृदयविकार आढळला

### जिल्हा रुग्णालयात एकाच दिवशी तपासणी, लवकरच होणार शस्त्रक्रिया

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती: –** जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) येथे मंगळवारी हृदयाचा त्रास होत असलेल्या ९४ बालकांचे टू-डी इको करण्यात आले. यामध्ये ३० बालकांमध्ये हृदयाला छिद्र म्हणजेच हृदयविकाराचा त्रास असल्याचे निदान करण्यात आले असून, लवकरच या बालकांचे प्राण वाचविण्यासाठी आरबीएसकेअंतर्गत मोफत हृदयविकार शस्त्रक्रिया देखील करण्यात येणार असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. नवीन वर्षात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात बालकांची तपासणी करण्यात आली.

बदलत्या जीवनशैलीमुळे हृदयविकाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्यामुळे याचे वेळीच योग्य निदान झाल्यास त्यावर उपचार करणे शक्य आहे. लहान मुलांनाही जन्मत:च हृदयविकार होतात. यामध्ये त्यांच्या हृदयाला छिद्र असणे, श्वास घेण्यास त्रास होणे, धाप लागणे यांसारखी लक्षणे असतात. त्यामुळे अशा बालकांवर राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वर्ष वयोगटातील मुलांचे वेळीच निदान करून मोफत उपचार केले जातात. त्यामुळे हृदयविकार आजाराचे निदान करण्यासाठी ‘टू डी इको’ हे आवश्यक आहे. त्यामुळे



जिल्हा सामान्य रुग्णालय येथे कार्यान्वित करण्यात आलेल्या टू-डी इको मशीनवर मंगळवारी हृदयाचा त्रास जाणवत असलेल्या ९४ बालकांची तपासणी करण्यात आली. या तपासणीमध्ये ३० बालकांमध्ये हृदयविकार असल्याचे निदान करण्यात आले आहे. त्यामुळे या बालकांचे प्राण वाचविण्यासाठी त्यांच्यावर लवकरच मोफत हृदयविकार शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यावेळी रुग्णांची तपासणी आचार्य विनोबा भावे रुग्णालय येथील बाल हृदयरोग तज्ज्ञ डॉ. शंतनू गोमासे यांनी केली. यावेळी समन्वयक प्रतीक गडकरी यांनी त्यांना मदत केली. ही तपासणी मोहीम यशस्वी करण्यासाठी आरबीएसके जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक नीलेश पुनसे, सांख्यिकी अन्वेक्षक प्रसाद अनासने, डीईआयसी व्यवस्थापक डॉ. प्रीती रोडे व जिल्ह्यातील संपूर्ण वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## बच्चू कडू म्हणजे कुटुंबात हट्ट धरणारा मुलगा, ते महायुतीतून बाहेर पडणार नाहीत: चंद्रकांत पाटील

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यामध्ये जागावाटपावर चर्चा सुरु आहे. अशातच प्रहार जनशक्ती पक्षाने अमरावती मतदारसंघावर दावा ठोकलाय. आम्ही सध्या कुणाच्याही बाजूने नाही, असेही त्यांनी म्हटले. त्यामुळे बच्चू कडू महायुतीमधून बाहेर पडणार का, अशी चर्चा सुरू झाली. मात्र, या चर्चेला भाजप नेते, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी फेटाळून लावले आहे. बच्चू कडू कुटुंबात असलेल्या हट्टी मुलासारखे असल्याची टिप्पणी चंद्रकांत पाटील यांनी केली आहे.



आमदार बच्चू कडू हे नाराज असल्याच्या चर्चा सुरू आहे. यावर मंत्री चंद्रकांत पाटील हे अमरावतीत दौऱ्यावर असतांना त्यांनी प्रतिक्रिया दिली. चंद्रकांत पाटील यांनी म्हटले की, बच्चू कडू नाराज नाहीत, एखाद्या कुटुंबात जो मुलगा हट्ट करतो पण मुलगा शिस्ती बाहेर जाणार नाही. बच्चू कडू हे महायुतीतुन बाहेर पडणार नाही. विरोधक मनातले मांडे खात आहे असं त्यांनी म्हटले.

मागील काही दिवसांपासून बच्चू कडू यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मराठा आरक्षण, शेतकऱ्यांचे प्रश्नावर सरकारवर नाराजीदेखील त्यांनी व्यक्त केली आहे. त्यानंतर आता अमरावती लोकसभा मतदारसंघावर दावा ठोकला आहे.

## अमरावती महामार्गावर तिहेरी अपघात

### पती-पत्नी ठार, मुलगी जखमी

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर: –** : नागपूर अमरावती महामार्गावरील राठी दवाखान्या जवळ आज (दि.४) झालेल्या विचित्र तिहेरी अपघातात पती-पत्नी ठार झाले. तर त्यांची मुलगी गंभीर जखमी झाली. अपघातानंतर मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आले. अक्षय गिरनाले व रजनी गिरनाले असे या मृत दाम्पत्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार अक्षय सुभाषराव गिरनाले (रत्नापूर, जि. अमरावती) है इर्टिका (डी. आय चक१२ डत्त ५९३९) या आपल्या चारचाकी वाहनाने पत्नी रजनीला नागपूर ला दवाखान्यात तपासणी करिता घेऊन गेले होते. त्यांच्या बरोबर त्यांची मुलगीही सोबत होती. तपासणी करून नागपूर अमरावती महामागनि परत येत असताना राठी दवाखान्याजवळ




आल्यानंतर त्यांचे कारचे नियंत्रण सुटले. व त्यांची कार एका ट्रकला तसेच नागपूरकडे येणाऱ्या अल्टो गाडीला धडकली. हा अपघात इतका भीषण होता की, पती- पत्नीचा कारमध्येच मृत्यू झाला. तर मागच्या सीटवर बसलेली त्यांची मुलगी बचावली. मुलीच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने तिला तातडीने रविनगर येथील हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. अक्षय गिरनाले व रजनी गिरनाले यांचे मृतदेह पोस्टमार्टमसाठी मेयो हॉस्पीटल येथे पाठव्रिण्यात आले असून याप्रकरणी वाडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक रायन्नावार अधिक तपास करीत आहेत.

# पालकमंत्र्यांच्या हस्ते 'शिवसृष्टी' विकासकामाचे भूमीपूजन

## सर्वांना अभिमान वाटेल, असे प्रेरणास्थळ निर्माण करा - पालकमंत्री पाटील

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** – छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी एकात्मिक विकास आराखडा तयार करावा. सर्वांना अभिमान वाटेल, असे जिल्ह्याचे हृदयस्थळ असलेल्या मालटेकडी येथे 'शिवसृष्टी'च्या रुपाने प्रेरणास्थळ निर्माण करा, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत(दादा) पाटील यांनी आज येथे केले.

महानगरपालिका क्षेत्रातील मालटेकडी येथे पर्यटन विकास योजनेंतर्गत विकास कामाचे भूमीपूजन पालकमंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार नवनीत राणा, आमदार प्रवीण पोटे पाटील, मनपा आयुक्त देवीदास पवार, माजी महापौर चेतन गावंडे, माजी नगरसेवक दिनेश बुब आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.





पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले की, शहराच्या मध्यभागी हिरवाळीने आच्छादलेल्या मालटेकडी येथे सकाळी व सायंकाळी मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. या निसर्गरम्य ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनपट व ऐतिहासिक घटनांची माहिती सर्वांना व्हावी, यासाठी शिवसृष्टी विकासांतर्गत म्युरल वॉलची निर्मिती करण्यात येत आहे. ते अधिक आकर्षित होण्यासाठी महानगरपालिकाने नियोजन करावे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आधारित राज्यातील विविध कामांचा अभ्यास करुन शहरात भव्य व अभिमान वाटेल असे प्रेरणास्थळ निर्माण करावे. शिवसृष्टी विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सर्वातोपरी प्रयत्न करु, असेही ते यावेळी म्हणाले.

महानगरपालिका क्षेत्रातील मालटेकडी येथे शिवसृष्टी निर्माण करण्यासाठी पर्यटन विकास विभागामार्फत ३ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. प्रथम टप्प्यामध्ये ३० लक्ष रुपये प्राप्त झाले असून त्यामधून मालटेकडी येथे संरक्षण भिंतीचे काम करण्यात आले आहे. दुसऱ्या टप्प्यात १ कोटी ३५ लाख रूपये प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारित १६ म्युरल वॉल तयार करण्यात येणार आहेत. तसेच त्यातील म्युरल वॉल छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या सुशोभिकरणासाठी लावण्यात येणार आहेत. तसेच आगामी काळात लेझर शो, वॉटर फाऊंटन, विद्युत रोषणाई, पाथ-वे, पाण्याची व्यवस्था, परिसरातील सौंदर्यीकरण इत्यादी कामे करण्यात येतील, अशी माहिती मनपा आयुक्त श्री. पवार यांनी यावेळी दिली.

# शंकरपटाचा थरार १५ जानेवारीपासून

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक तळेगाव दशासर :** कै. नानासाहेब देशमुख यांनी सुरू केलेला व कै. बापूसाहेब देशमुख यांनी कायम राखलेला तळेगाव दशासर येथील कृषक सुधार मंडळाद्वारे आयोजित शंकरपटाचा थरार येथे १५ जानेवारीपासून रंगणार आहे, तर १९ जानेवारी रोजी कुस्ती स्पर्धा, कृषी प्रदर्शन होईल. पंचक्रोशीतीलच नव्हे, तर आजूबाजूच्या जिल्ह्यातील शेतकरी व गावकरी पटासोबत होणाऱ्या यात्रेची उत्सुकतेने प्रतीक्षा करीत आहेत. तळेगाव दशासर येथील शंकरपट हा नुसता पट नाही, तर गावाकऱ्यांसाठी मोठा उत्सवच असतो. यानिमित्त पटाच्या भव्य मैदानात मोठी यात्रासुद्धा भरते. शंकरपटात १५ जानेवारी रोजी दो दाणी स्पर्धा, तर १६ व १७ जानेवारी रोजी एकदानी स्पर्धा होतील.



१८ जानेवारी रोजी महिला आरक्षित बैलजोडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १९ जानेवारी रोजी जंगी कुस्ती स्पर्धा व कृषी/पशू प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

शंकरपटाची सुरुवात मंदिरातील महादेवाच्या पूजनाने करण्याची पूर्वापार परंपरा आहे. या काळात मोठ्या संख्येने यात्रेत येणारे भाविक दर्शनासाठी गर्दी करणार आहेत. पटादरम्यान दोरखंडापासून शेतीला लागणारे सर्व साहित्य तसेच बैल सजावटीचे साहित्य व इतरही साहित्य तसेच मोठा बैल बाजार, मनोरंजनाची साधने, गृहसजावटीच्या वस्तूंमधून लाखोंची उलाढाल शंकरपट पाहणाऱ्यांकडून या ठिकाणी होते.

# पालक मंत्र्यांना नाट्य गृहाचे संबंधित निवेदन

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** नुकताच अमरावती मधे मुंबई येथून आलेल्या व्यावसायिक नाटका दरम्यान कलावंतांनी नाट्य गृहातील समस्यांचे संदर्भात नाराजी व्यक्त केल्या चा विषय चर्चेत येताच नाट्य परिषद नियामक मंडळ सदस्य ऍड. प्रशांत देशपांडे यांनी पुढाकार घेऊन अमरावती मधील कलावंत, प्रतिष्ठित नागरिक, प्राध्यापक, डॉक्टर, पत्रकार आणि रसिकांची सभा बोलावून, मान्यवरांचे विचार आणि मत ऐकल्यानंतर सर्व संमतीने ही बाब युद्ध पातळीवर हाताळण्याचा निर्णय घेतला. अमरावती जिल्हा पालकमंत्री ना. चंद्रकांत दादा पाटील यांना आज संत ज्ञानेश्वर नाट्य गृहातील असुविधा आणि तातडीने आवश्यक असलेल्या दुरुस्त्या व सोईंच्या संबंधित निवेदन देण्यात आले.

नाट्य परिषदेचे मार्गदर्शक खा. डॉ. अनिल बोंडे, आ. प्रवीण पोटे, नाट्य परिषद मध्यवर्ती चे नियामक मंडळ सदस्य ऍड. प्रशांत देशपांडे आणि नाट्य परिषद अमरावती चे अध्यक्ष ऍड. चंद्रशेखर डोरले यांनी पालक मंत्र्यासोबत झालेल्या चर्चेत नाट्य गृहात असलेल्या गैरव्यवस्था,



रंगमांचाची झालेली दुर्दशा, ग्रीन रूम मधील आवश्यक दुरुस्त्या, कुलिंग व्यवस्था, ध्वनी क्षेपण व्यवस्था इत्यादी सर्व बाबी ना. चंद्रकांत दादा पाटील यांचे निदर्शनास आणून दिल्यात. सर्व तक्रारी समजवून घेतल्या नंतर मा. पालक मंत्र्यांनी तातडीने या सर्व बाबींचा खर्चाचा अंदाज काढून त्यांना देण्याचे निर्देश दिलेत आणि सर्व समस्या त्वरित दूर करण्या साठी जातीने लक्ष घालून निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. पालक मंत्री पाटील यांनी आश्वासन दिल्या नंतर आता या संदर्भात सर्व लोकप्रतिनिधीची सुद्धा मदत घेण्यासाठी संपर्क अभियान राबावण्यात येणार असल्याची माहिती नाट्य परिषदेचे अध्यक्ष ऍड. चंद्रशेखर डोरले यांनी कळवली आहे.

# महाविजय २०२४ साठी पक्षाच्या कार्यक्रमाची प्रत्येक घटकात प्रभावी अंमलबजावणी करा

## भाजपा प्रदेश संघटन मंत्री डॉ.उपेंद्र कोठेकर यांचे प्रतिपादन

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** भारतीय जनता पक्ष हा प्रथम राष्ट्र नंतर पार्टी शेवटी स्वतः या ब्रीदानुसार काम करत असल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पुन्हा प्रधानमंत्री करण्यासाठी महाविजय २०२४ करिता सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी समाजातल्या प्रत्येक घटकात करावी, असे प्रतिपादन भाजपा विदर्भ संघटन मंत्री डॉ.उपेंद्र कोठेकर यांनी केले.

बुधवारी (ता.३) येथे भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक पार पडली. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना डॉ.कोठेकर हे बोलत होते.

### पक्षाचे संघटन बळकट करण्यासाठी प्रयत्न करा : आ.रणधीर सावरकर

प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी बैठकीदरम्यान पक्ष संघटनेच्या बांधणीचा आढावा घेतला. पक्षाची रचना समजून घेऊन त्या पद्धतीने संघटन मजबूत करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. केंद्र व राज्याच्या योजना समजून घेऊन त्या नागरिकांपर्यंत पोहोचाव्या, यासाठी पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे. पक्षाला लोकाभिमुख करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे .भारतीय जनता पक्ष हा मुळातच विकासाचे राजकारण करणारा पक्ष आहे. जो काम करेल त्यालाच या पक्षात महत्त्व असेल त्यामुळे सर्वांनी आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी झोकून देऊन काम करावे असेही आमदार रणधीर सावरकर यावेळी म्हणाले.

दरम्यान त्यांनी प्रत्यक्ष नागरिकांमध्ये जावून काम करणे, नव मतदार नोंदणी यासह केंद्रीय व राज्य पातळीवर भाजपाकडून येणाऱ्या कार्यक्रमांसह स्थानिक स्तरावरील कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सुचना पदाधिकाऱ्यांना केल्या. भाजपा



प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, राज्यसभेचे खासदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे, जिल्हा प्रभारी सरिताताई गाखरे, शिवराय कुलकर्णी, दिनेश सूर्यवंशी, जयंत डेहनकर, सरचिटणीस नितीन गुडधे-पाटील, विवेक गुल्हाने, डॉ.विलास कविटकर, रेखा मावसकर, अनिताताई तिखिले, प्रणिता शिरभाते, मालाताई डोईफोडे, मीनाताई पाठक, रुपाली सोंडे, अंजलीताई तुमराम, किरण पातुरकर, राजेश वानखडे, गोपाल चंदन, नकुल सोनटक्के, प्रवीण तायडे, डॉ.मनोहर आंडे, प्रभुदास भिलावेकर, रमेश बुंदिले, बाळासाहेब वानखडे, इंद्रभूषण सोंडे सत्यजित राठोड, पद्माकर सांगोळे, अजिंक्य वानखडे, बाबाराव बरवट, मदन बायस्कार, रवींद्र ढोकणे, मनोहर लेवटे, योगेश्वर खासबगे, श्रीधर सोलव, राजकुमार राऊत, प्रवीण राऊत, मेघा भारती, वनिता धर्मा, किरण देशमुख, शरद मोहोड, मुरली माकोडे, यांच्यासह भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांनी प्रास्ताविकाच्या माध्यमातून पक्षाच्या आगामी कार्यक्रमांची माहिती दिली. शिवराय कुलकर्णी, जयंत डेहणकर, दिनेश सूर्यवंशी, संजय फांजे, रेखा मावसकर आदींनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमांचे प्रथम सत्राचे संचालक विलास कविटकर यांनी तर द्वितीय सत्राचे विवेक गुल्हाणे यांनी केले. कार्यक्रमाची सुरूवात महाराष्ट्र गिताने तर राष्ट्रगिताने सांगता झाली. आभार प्रदर्शन नितीन गुडधे पाटील यांनी केले.

### दोन्ही लोकसभा काबीज करायच्या आहेत : डॉ.अनिल बोंडे

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पुन्हा प्रधानमंत्री बनवण्यासाठी पक्षाने प्रत्येकाला दिलेली जबाबदारी सर्वांनी प्रामाणिकपणे पूर्ण करावी. अमरावती व वर्धा अशा दोन्ही लोकसभेत भाजपचे कमळ फुलविण्यासाठी सर्वांनी परिश्रम घ्यावे. जिल्हा पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, मोर्चा, आघाडी, सेल, प्रकोष्ट, विधानसभाप्रमुख, बुथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख, पेजप्रमुख, पन्नाप्रमुख यासह भाजपच्या संपूर्ण पदाधिकाऱ्यांनी नमो ऐप्स, सर ऐप्स, नव मतदार नोंदणी, समाज माध्यमावर सक्रिय सहभाग वाढवावा. यासह विकसित भारत संकल्पयात्रे अंतर्गत सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने नागरिकांमध्ये जावे. नव मतदार नोंदणीवर विशेष लक्ष केंद्रित करावे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे नागरिकांच्या घरोघरी जाऊन श्रम घेत आहेत. त्याप्रमाणेच प्रत्येकाला काम करायचे असल्याचेही प्रतिपादन खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी यावेळी केले.

# तरुणांनी मैदानी खेळाकडे वळावे - डॉ. सुनील देशमुख

## मॉर्निंग क्रिकेट चषक २०२४ चे उद्घाटन सोहळा संपन्न

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** आजच्या टीव्ही व मोबाईलच्या युगात मैदानी खेळाचे महत्व कमी होत असताना मॉर्निंग क्रिकेट क्लब द्वारा घेण्यात येणाऱ्या टेनिस बॉल क्रिकेट सामन्यांचे आयोजन करून एक स्तुत्य उपक्रम सुरू केल्यामुळे मॉर्निंग क्रिकेट क्लब कौतुकास प्राप्त आहे, असे उद्गार माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी काढले. शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री. शिवाजी शिक्षण संस्था कर्मचारी व मॉर्निंग क्रिकेट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने वा.मो. उपाख्य दादासाहेब काळमेघ व स्व. गोटूभाऊ उर्फ प्रशांत चांदुरकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ मॉर्निंग चषक टेनिस बॉल क्रिकेट सामने रुरल इन्स्टिट्यूटच्या प्रांगणात दिनांक ४ जानेवारी २०२४ ते १४ जानेवारी २०२४ पर्यंत आयोजित सामन्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या मॉर्निंग चषक २०२४ च्या उद्घाटन प्रसंगी मा.श्री. सदाशिव चिंचे मा.श्री.श्रीरामजी भटकर, मा. श्री.नरेशभाऊ रामेकर, प्राचार्या डॉ.स्मितातार्ई देशमुख, प्राचार्या प्रा. पूनम मोहोड, प्राचार्य डॉ. गजानन गोसावी, प्राचार्या वैशाली बिजवे (गुल्हाने), प्रा. विलास ठाकरे, मा.प्रा. भालचंद्र घोंगडे, मिलिंद चिमोटे, वैभव देशमुख, संदीप सगणे, प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून ,तसेच खेळपट्टीचे विधीवत पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



मा.डॉ.सुनीलभाऊ देशमुख यांनी फलंदाजी करून सामन्याचे उद्घाटन केले. या कार्यक्रम प्रसंगी मा. सदाशिवराव चींचे ,नरेश भाऊ रामेकर,प्रा. विलास ठाकरे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.या ठिकाणी नागपूर, वर्धा, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, अकोला व अमरावती जिल्ह्यातील संघांनी भाग घेतला आहे. या कार्यक्रमाची प्रास्ताविक मिलिंद पुंड यांनी केले असून आभार प्रदर्शन शिवाभाऊ यांनी केले.

# अमरावतीतील विद्यार्थ्यांना प्रश्न आणि उत्तर संचाचे वाटप

## राजकीय धामधुमीतही अॅड. यशोमती ठाकूरांनी जोपासली सामाजिक बांधिलकी



**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** अमरावती जिल्ह्यातील तिवसा मतदार संघातील काँग्रेसच्या ज्येष्ठ आमदार एडवोकेट यशोमती ठाकूर यांनी राजकीय धामधुमीतही सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. मतदार संघातील सर्व विज्ञान शाखेच्या अकरावी आणि बारावी इयत्तेच्या विद्यार्थ्यांना प्रश्नसंच आणि उत्तर संचाचे वितरण केले आहे याचा या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आणि अधिकाधिक यश संपादन करण्यासाठी निश्चितच उपयोग होईल अशी प्रतिक्रिया ही ड. ठाकूर यांनी व्यक्त केली आहे.

श्री रामचंद्र युवक कल्याण संस्था आणि आमदार एडवोकेट यशोमती ठाकूर यांच्या पुढाकारातून तिवसा मतदार संघातील अकरावी आणि बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना १९९६ ते २०२३ या काळात संशोधित केलेल्या परीक्षांचे प्रश्नसंच आणि उत्तर संच यांचे मोफत वितरण करण्यात आले. तिवसा तालुक्यातील गुरुदेव विद्या मंदिर मोझरी, श्री देवराव दादा महाविद्यालय, विद्यानिकेतन हायस्कूल कुऱ्हा, स्वर्गीय बाबासाहेब वराडे महाविद्यालय वलगाव आणि मतदारसंघातील सर्व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना हे प्रश्नसंच देण्यात आले.

आजचा स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना अधिकारी यश संपादन करण्यासाठी हे प्रश्नसंच निश्चितच उपयोगी पडतील. विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र रसायनशास्त्र जीवशास्त्र आणि गणित या विषयांचा संशोधित



अभ्यासक्रम या पुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिला गेल्याने ऐन परीक्षेचा तोंडावर त्यांना निश्चितच याचा लाभ होणार आहे. यावेळी आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचसोबत प्राध्यापक शिवाजी कुचे, डॉक्टर भांडे अकादमीचे सोनी सर, महाविद्यालय प्राचार्य कडू सर, चव्हाण सर, भक्ती सर यांनीही मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. यावेळी बोलताना उपस्थित वक्तांनी अंधश्रद्धा आणि बुवाबाजी यापासून नव्या पिढीला दूर करून फुले, शाहू, आंबेडकर यांनी जे शिक्षणाचे महत्त्व, सांगितले आहे त्या वाटेवरून चालण्याचा सल्ला दिला. या कार्यक्रमाला सभापती प. स तिवसा कल्पना दिवे, डॉक्टर राजीवजी ठाकूर अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश मोरे माजी जी प सदस्य गजानन राठोड ,राजूभाऊ कुरेकर, निर्मळ दादा डॉ.रघुनाथ वाडेकर, पंकज देशमुख, सतीश पोजगे, प्रफुल्ल देशमुख , गुरुदेव नगरच्या सरपंच वैशाली धुमोणे , माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक वैभव वानखडे उपसरपंच मिलिंद काळमेघ, तिवसा येथे नगराध्यक्ष योगेश वानखडे दिलीपराव काळबांडे सेतू देशमुख सागर राऊत ,उमेश राऊत, किसन मुंदाणे ,दिवाकर भुरभुरे नरेंद्र विघ्ने, तुषार लेवटे ,कुर्हा येथे मंगेश भगोले शहजाद पटेल, संजय चौधरी ,अक्षय पवार ,बाबू दमाये, प्रदीप पचलोरे ,अब्दुल सत्तार, किशोर दिवे ,अक्षय पवार ऋषभ वानरे ,आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मालकी पट्ट्यासाठी आवास योजना लाभार्थ्यांची भटकंती

## जिल्हा प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मालकी पट्टे देणे आवश्यक आहे. मात्र गत काही दशकांपासून शेकडो लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळालाच नाही. परिणामी या लाभार्थ्यांची सातत्याने भटकंती सुरू आहे. शासनाच्या आदेशाची अवहेलना होत असून या लाभार्थींना तातडीने घरकुलाचे मालकी पट्टे देण्यात यावे अशी मागणी होऊ लागली आहे.

महाराष्ट्रात इंदिरा आवास योजना १९८९ पासून ते १९९५ पर्यंत जवाहर रोजगार योजनेची उपाययोजना म्हणून राबवली जात होती. मात्र त्यानंतर १ जानेवारी १९९६ पासून ही योजना केंद्र पुरस्कृत योजना म्हणून स्वतंत्रपणे



राबविण्यात येत आहे. या योजनेच्या निधीची उपलब्धता ७५:२५ या पद्धतीप्रमाणे ठरविण्यात आली आहे.या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील बेघर व कच्चे घर असलेल्या कुटुंबांसाठी घरकुल बांधणीअंतर्गत अनुदान देण्यात येत असते. या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी व्यक्तीचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या यादीत असणे आवश्यक आहे. ही यादी बेघर कुटुंबांची असते.अनुसूचित जाती जमातीसाठी ६० टक्के निधी आरक्षित ठेवला जातो. जिल्हानिहाय घरकुलांचे वाटप केंद्र शासनाने ठरविलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने इंदिरा गांधी आवास योजनेतील घरकुलांबाबतची कारवाई जिल्हा यंत्रणा यांच्यामार्फत नेहमी पूर्ण करण्यात येत असते. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील बेघरांपैकी ज्यांना स्वतःची जागा नाही, अशा कुटुंबासाठी जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात योजनेला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.

ही योजना केंद्र व राज्य शासन ५०:५० अशी पुरस्कृत आहे. या योजनेअंतर्गत घरकुलाच्या जागेसाठी प्रत्येक लाभार्थ्यास साधारण १०० ते २५० चौरस मीटर जागा खरेदी करणे किंवा जागा ताब्यात घेण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यापैकी जी कमी असेल एवढे आर्थिक साहाय्य अदा करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला. मात्र त्यांना मालकी पट्टे मिळाले नाहीत.

### लाभार्थी मदतीच्या अपेक्षेत

गत काही दशकांपासून जिल्ह्यातील लाभार्थी इंदिरा आवास योजनेच्या मालकी पट्ट्यापासून वंचित आहेत. जिल्हा प्रशासनाने वेळेत लक्ष घालून लाभ देण्याची मागणी ही लाभार्थी करीत आहेत. वेळेवर योजनेचा लाभ मिळत नसेल तर योजनेचा लाभ काय? असा सवालही उपस्थित होत आहे.

# गॅसचे अनुदान होईल बंद ई-केवायसी केली का?

## आवाहन करूनही ग्राहकांकडून प्रतिसादच नाही




**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

मागील काही महिन्यांपासून गॅस सबसिडी तशीही कमी झाली आहे. अशात आता हातात पडणारी थोडीथोडकी सबसिडीही ई-केवायसी न केल्यास हातून जाणार आहे. यासाठी प्रत्येकांना ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र अनेकांना यासंदर्भातील माहितीच नाही. बहुतांश ग्राहक याबाबत अनभिज्ञ आहेत. त्यामुळे पुढील काळात अडचणीत भर पडण्याची शक्यता आहे.

सिलिंडरची ई-केवायसी केली नसेल तर त्वरित करून घेणेच फायद्याचे ठरणार आहे. जिल्ह्यातील बहुतांश गॅस एजन्सीच्या बाहेर ग्राहकांनी ई-केवायसी तत्काळ करावी, असे बॅनर लावण्यात आले आहे. पूर्वी यासाठी ३१ डिसेंबरपर्यंतचाच अवधी होता. मात्र अनेकांनी ई-केवायसी न केल्याने ई-केवायसीच्या प्रक्रियेला शिथिलता दिली आहे. ई-केवायसी करताना थंब न जुळण्याचा प्रकारही वाढला आहे. विशेषतः जिल्ह्यात ग्रामीण भागामध्ये अजूनही अनेकांनी ई-केवायसी केली नसल्याने त्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.उज्ज्वला गॅसकरिता लाभार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. एका सिलिंडरवर ग्राहकाला ३०० रुपयांची सबसिडी जाहीर करण्यात आली आहे.

### जिल्ह्यात उज्ज्वला गॅसचे लाखो लाभार्थी

जिल्ह्यात उज्ज्वला गॅसचे तीन लाखांवर लाभार्थी आहेत. या ग्राहकांना एका सिलिंडरवर ३०० रुपयांची सबसिडी देण्यात आली आहे. या ठिकाणी ई-केवायसी न केल्यास त्याचा मोठा फटका ग्राहकांना सहन करावा लागणार आहे.

### ...तर अनुदान होईल बंद

ग्राहकांनी मुदतीत ई-केवायसी केली नाही तर त्यांना सबसिडीपासून मुकावे लागणार आहे. यापूर्वी ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी करण्याची मुदत देण्यात आली होती. आता यामध्ये शिथिलता देण्यात आली आहे.

# संपकरी अंगणवाडी सेविकांना 'शो कॉज'; खुलासा सादर करण्याचे आदेश

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्हाभरात गत महिनभरापासून २ हजार ४६२ अंगणवाडी सेविका, मदतनीस विविध मागण्यांसाठी संपावर गेल्या आहेत. यामुळे सर्व अंगणवाडी केंद्राना टाळे लागले आहेत. परिणामी आता जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने संपावर गेलेल्या अंगणवाडी सेविकांना विना परवानगीने गैरहजर असल्याचे कारण पुढे २३१५ अंगणवाडी सेविका, १४७ मिनी अंगणवाडी सेविका आणि २४०० मदतनीस आदींना नोटीस बजाविलेल्या आहेत.

अंगणवाडी सेविकांना दरमहा २६ हजार आणि मदतनीसांना २० हजार रुपये मानधन द्या, कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा यासह अन्य मागण्यांसाठी अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांनी गत ४ डिसेंबर पासून जिल्हाभरातील २३१५ अंगणवाडी सेविका आणि २४०० मदतनीस आणि १४७ मिनी अंगणवाडी सेविका बेमुदत संपावर गेलेल्या आहेत. या संपामुळे महिनाभरापासून अंगणवाड्यांना टाळे लागले. याअनुषंगाने जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने संपावर गेलेल्या अंगणवाडी सेविकांना विना परवानगीने गैरहजर असल्याने अंगणवाडी केंद्रातील कामकाज खोळंबलेले आहेत. विशेष म्हणजे नव्याने अंगणवाडी सेविका म्हणून रुजू होऊन एक वर्षाचाही कालावधी झाला नाही. नियुक्ती आदेशाद्वारे करारनाम्यामध्ये अंतर्भूत असून काम असमाधानकारक असल्यास कोणत्याही प्रकारची पूर्वनोटीस न देता कामावरून कमी करण्याचे या नोटीसमध्ये म्हटले आहे. त्यानुसार कामावर हजर होण्याबाबत वारंवार कळविले आहे. परंतु यावर कुठलाही खुलासा केलेला नसल्याने तसेच अंगणवाडी केंद्रात विना परवानगी गैरहजर राहणे, अंगणवाडी केंद्रामध्ये अस्वच्छता पाळणे, कामकाज खोळंबलेली आहेत. बालकांची काळजी घेण्याबाबत न सांगणे, बालकांचे लसीकरणकरिता केंद्रात न आणणे या कृतीमुळे पहिल्या टप्प्यात नव्याने नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना कारणे दाखवा नोटीस बजाविलेल्या आहेत.

# १२ जानेवारीला युवा स्वाभिमान साजरा करणार वर्धापन दिन

## पंतप्रधान आवास योजना लाभार्थ्यांना घरकुल वाटप,अंगणवाडी सेविका मेळावा, दिव्यांग व्यक्तींना होणार साहित्य वाटप

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या पावन पर्वावर १२ जानेवारी २०२४ रोजी युवा स्वाभिमान पार्टी चा वर्धापन दिवस सांस्कृतिक भवन अमरावती येथे अत्यंत उत्साहात विविध कार्यक्रमाने साजरा होणार आहे. त्या कार्यक्रमाचा आढावा व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन नुकतेच आमदार रवी राणा यांनी केले. राणा दांपत्याच्या नेतृत्वात सर्व शासकीय विभागाचे महाराजस्व अभियान शासन आपल्या दारी राबवून गरजू लाभार्थ्यांना न्याय मिळवून देणार आहे.

दरवर्षी प्रमाणे या हि वर्षी राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंती धुमधडाक्यात साजरी करण्यात आहे. या वेळी पंतप्रधान आवास योजना लाभार्थ्यांना घरकुल वाटप,अंगणवाडी सेविका मेळावा, दिव्यांग व्यक्तींना साहित्य वाटप,मुद्रा लोण वाटप,विविध योजना लाभार्थी मदत,पी आर कार्ड वाटप,आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,महसूल विभाग,कृषी विभाग आदी विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी सकाळी ९ वाजतापासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थित राहून नागरिकांच्या अडी अडचणी सोडविणे,लाभार्थ्यांना जागेवर



लाभ मिळवून देणे यासाठी हे अभियान राबविले जाईल. या भव्य दिव्य कार्यक्रमात आमदार रवी राणा व खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी मुंबई स्तरावर मंजूर करून आणलेले शहरी ग्रामीण भागातील ८० ते ९० हजार लोकांना पी आर कार्ड व ८ (अ) वाटप करण्यात येईल. या कार्यक्रमाचे पूर्वतयारी व नियोजनासाठी आज आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येवून विविध समित्यांचे गठण करण्यात आले व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या,सर्वांनी आपापली जबाबदारी निष्ठेने पार पाडून हा कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहन आमदार रवी राणा यांनी केले .

यावेळी राष्ट्रीय कोषाध्यक्ष शैलेंद्र कस्तुरे, जिल्हाध्यक्ष जितु दुधाने,शहर अध्यक्ष संजय हिंगासपूरे,महिला जिल्हाध्यक्ष सौ ज्योती सैरीसे,महिला शहर अध्यक्ष सुमती ढोके, किशोर पिवाल,विनोद गुहे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे संचालन सुधीर लवणकर यांनी केले.या कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी सुनील भाऊ राणा यांच्या नेतृत्वात अजय जयस्वाल,विनोद जायलवाल, संजय मूनोत, आशिष गावंडे,हरीश चरपे,प्रा अजय गाडे,सुकदेव तरडेजा,रॉय काका, देवुलकर काका,विलास वाडेकर,नाना सावरकर,बाळू इंगोले,आशिष कावरे,मंगेश पाटील इंगोले,लता अंबुलकर,साक्षी उमप,गावंडे ताई,बनकर ताई,रइसा परवीन, मतलाने ताई,अनिकेत कोकाटे, अविनाश काळे,खुश उपाध्याय, अनिल मिश्रा आदींनी परिश्रम घेतले.

# सकारात्मक पत्रकारिता समाज परिवर्तनाची नांदी : आ. संजय कुटे

## जळगाव (जामोद) येथे अ. भा. ग्रामीण पत्रकार संघाचे एक दिवसीय खुले राज्यस्तरीय अधिवेशन



**दि.५विदर्भ प्रजासत्ताक जळगाव (जामोद)**

पत्रकारिता हे पवित्र कार्य आहे. पत्रकारांनी कोणाविषयी लिहिले तर त्यांनी ते सकारात्मक घ्यावे व त्यातून पुढची दिशा ठरवावी. मात्र पत्रकारांनी आपल्या लिखानामुळे कोणाचे आयुष्य उध्वस्त होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच पत्रकारांनी संसाराकडे लक्ष देऊनच पत्रकारिता करावी. मी विधानसभा सभागृहात पश्चिम विदर्भाविषयीच्या समस्या ३ वेळा मांडल्या आहेत. अमरावती विभागातील पत्रकारांनी सुध्दा पश्चिम विदर्भाला प्राधान्य देत या परिसरातील बाबींवर विशेष लिखान करावे. सकारात्मक पत्रकारिता ही समाज परिवर्तनाची नांदी आहे असे प्रतिपादन माजी मंत्री, आमदार डॉ. संजय कुटे यांनी केले. तसेच पत्रकारांच्या पाठीशी नेहमी असल्याचे सुध्दा त्यांनी सांगितले. ते जळगाव (जामोद) येथील बऱ्हाणपूर रोडवर असलेल्या देवाशिष लॉन्स येथे गुरूवारी आयोजित अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या एक दिवसीय खुले राज्यस्तरीय अधिवेशनात उद्घाटनीय भाषणात बोलत होते. या अधिवेशनाचे आयोजक अखिल भारतीय पत्रकार संघ तर संयोजक आम्ही जळगांवकर पत्रकार होते.

या अधिवेशनाच्या प्रथम सत्रात सकाळी उद्घाटन समारंभ झाला. याचे उद्घाटन माजी मंत्री,आमदार डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते झाले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ. भा. ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने, प्रमुख पाहुणे म्हणून राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष तथा दै.लोकमत मुंबई चे सहयोगी संपादक यदु जोशी, आय.एन.एस. समिती, नवी दिल्ली चे कार्यकारी सदस्य तथा दै. हिन्दुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, अमरावती विभागीय अधिस्विकृती समितीचे सदस्य तथा दै. वृत्तकेसरी अमरावतीचे संपादक जयराम आहुजा, अमरावती विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष रवींद्र लाखोडे, दै. महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक, अमरावती विभागीय अधिस्विकृती समिती सदस्य सुरेंद्रकुमार आकोडे, गोपाल हरणे, अ. भा. ग्रामिण पत्रकार संघाचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान, केंद्रीय महासचिव सुरेश सवळे, केंद्रीय सचिव अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख, महिला मंच प्रदेश अध्यक्ष जयश्री पंडागळे, केंद्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, केंद्रीय सदस्य माणिक ठाकरे, प्रदीप जोशी, केंद्रीय संपर्क प्रमुख प्रा.रवींद्र मेंढे, केंद्रीय सदस्य बाळासाहेब सोरगीवकर, मनोहर चरपे, संजय कदम, अभिमन्यू भगत, कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे, राजेंद्र माळवे, मनोज कमटे, अनुप गवळी, प्रताप मोरे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला स्वागतगीत संजय तल्हार यांनी सादर केले.तर प्रास्ताविक प्रदेशाध्यक्ष कैलासबापू देशमुख यांनी केले.यानंतर यदु जोशी, विलास मराठे, रवींद्र लाखोडे, मनोहर सुने यांनी मनोगत व्यक्त केले. तर व्दितीय सत्र दुपारी झाले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी दै. महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव डॉ. स्वाती संदिप वाकेकर, राजर्षी शाहू परिवार तथा संकल्पक वन बुलढाणा मिशनचे अध्यक्ष संदिप शेळके, मिना राहीज, वर्षा घाडगे, भावना सरनाईक आदींची उपस्थिती होती.


यावेळी उपस्थित मान्यवरांसह माधुरी शर्मा, रवींद्र तिराणीक यांसह इतर पत्रकारांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन अनिल अभिमन्यु भगत व कांचन मुरके यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. रवींद्र मेंढे यांनी केले. या अधिवेशनाच्या यशस्वीतेकरिता अ.भा.ग्रा. पत्रकार संघ, जळगाव जामोद तालुका कार्यकारीणी, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, नांदगाव खंडेश्वर, अमरावती व इतर कार्यकारीणीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. या अधिवेशनात राज्यभरातील पत्रकार बांधव सहभागी झाले होते.

### पत्रकारांच्या समस्यांचा अहवाल शासनाला देणार

ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्यांची मला कल्पना आहे. महाराष्ट्रातील पत्रकारांच्या समस्या घेऊन यासंबंधीचा अहवाल काही दिवसांतच शासन दरबारी देणार आहो. त्यामुळे यातील जास्तीत जास्त विषय मार्गी लागावे याकरिता आमदार डॉ. संजय कुटे यांनी सहकार्य करावे अशी विनंती यावेळी राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी केली.

### अधिवेशनात मांडले २३ ठराव

प्रिंट मीडिया व इले. मीडियाकरीता पत्रकार कल्याण महामंडळ स्थापण करण्यात यावे, तालुका स्तरावर पत्रकार भवनाचे बांधकाम करण्यात यावे, पत्रकाराच्या शिबीर व कार्यशाळाकरीता अनुदान देण्यात यावे, ग्रामीण व शहरी पत्रकारांसाठी म्हाडा मार्फत स्वतंत्र घरकुल योजना राबविण्यात यावी, पत्रकारांच्या सुरक्षीततेच्या हमीसह विमा योजना शासनाने लागू करावी, पत्रकारांना (५ वर्ष सेवा पूर्ण झालेले) मानधन लागु करण्यात यावे व ६० वर्षानंतर पेंशन योजना लाभ मिळावा, विना परवानगी व्देष भावनेतून ग्रामीण व शहरी पत्रकारांवर न्यायालयीन खटले, अथवा पोलीस कार्यवाही जिल्हाधिऱ्यांच्या परवानगीशिवाय गुन्हा नोंद करण्यात येवू नये, पत्रकारांना वृत्तसंकलनाच्या कामाकरीता एस. टी. व रेल्वेमध्ये विनाअट सवलत मिळावी यांसह विविध २३ ठराव या अधिवेशनात मांडून त्याची प्रत शासनाकडे पाठविण्यात आली.

भव्य शुभारंभ
शुक्रवार, ५ जानेवारी २०२४ सकाळी ११ वाजता, मेन रोड, बनोसा दर्यापुर, जि. अमरावती.